**<u>वादी तर्फे श्री. डी.एल.घोगरे यांच्यामार्फत उलटतपास सुरु.</u>**

**७.** हे खरे की, रु.८,१७,७१,२२०/ ही रक्कम नुकसानभरपाईपोटी शासनाने मंजूर केली. हे खरे की, या रक्कमेचा निवाडा झालेला आहे. सदरची रक्कम माझे वडील नागनाथ यांच्या नावे न्यायालयात जमा आहे. माझे भाऊ प्रतिवादी क्रं. २,३ आणि मी यांनी ही रक्कम उचललेली नाही.

**८.** हिराबाईने नागनाथ यांच्याविरुध्द रे.दि.मु.०६/२०१३ व जुना रे.दि.मु.१८५/२००१ हा दावा दाखल केला हे खरे आहे. हिराबाईचा दावा मंजूर झाला व त्याविरुध्द माझ्या वडीलांनी रे.दि.अ.क्रं.५३/२०१५ दाखल केले हे खरे आहे. आता मला नि.क्रं.९८ दाखविला. सदरचा अर्ज मी, रामचंद्र, हरीश्चंद्र यांनी केला होता. त्यावर माझी सही आहे. दि.०७/०८/२०१८ रोजीच्या मृत्यूपत्राप्रमाणे त्या अपीलात आम्हांला सामील करुन घ्यावे असा आमचा अर्ज होता हे म्हणणे खरे नाही. नागनाथने केलेले मुळ मृत्यूपत्र त्या अर्जासोबत आम्ही दाखल केले होते हे म्हणणे खरे नाही. सदर मृत्यूपत्र दि.०१/०३/२०२१ रोजी नागनाथच्या कपडयांमध्ये सापडले असल्याचा उल्लेख त्या अर्जात आहे हे खरे नाही. हे खरे की, त्या अर्जावर जिल्हा न्यायालयाने आदेश पारीत केला. हे खरे की, दि.१०/१०/२०२२ रोजी जिल्हा न्यायालयाने आमचा नि.क्रं.३७ चा अर्ज अंतीमत: मंजूर केला व आम्हांला अपीलामध्ये सामील करुन घेतले.

**९.** हे खरे नाही की, त्या मृत्यूपत्रांवर पुरावा आला. त्याकामी मृत्यूपत्राला निशाणी २४९ देण्यात आली हे खरे नाही. माझे वडील शेवटीशेवटी अंगठा करत होते हे म्हणणे खरे आहे. आता मला त्या दाव्यात नि.क्रं.२४९ दिलेले मृत्यूपत्र दाखविले. त्यातील आधारकार्ड माझ्या वडीलांचे आहे. त्यावरील अंगठा माझ्या वडीलांचा नाही. हे खरे नाही की, त्या मृत्यूपत्राचा फायदा आम्ही रे.दि.अ.क्रं.५३/२०१५ मध्ये घेतलेला आहे. हे खरे नाही की, माझा भाऊ रामचंद्र याच्या कब्जातून सदर मृत्यूपत्र न्यायालयात दाखल केले होते. हे खरे नाही की, या मृत्यूपत्राने वादी व आमच्यात नागनाथ यांनी दावारक्कमेची विभागणी केली. वादींना या रक्कमेतील रक्कम आल्यानंतर मी माझ्या इच्छेप्रमाणे देण्यास

तयार आहे. हे खरे नाही की, मृत्यूपत्रात आलेली रक्कम आम्ही भावांनी स्वीकारयाची आणि मृत्यूपत्रातील इच्छेप्रमाणे तिचे वाटप करायचे. हे खरे नाही की, मृत्यूपत्र नोंदणीकृत आहे. वादींना मृत्यूपत्राप्रमाणे रक्कमेतील हिस्सा जाईल म्हणून मृत्यूपत्र खोटे आहे असे मी म्हणतो हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, मृत्यूपत्रातील रक्कम वाटपाचा मजकूर खरा आहे. हे खरे नाही की, वादी क्रं.१ हिला ७० लाख व प्र.वादी क्रं. २ ते ६ यांना प्रत्येकी ६५ लाख एवढी रक्कम मिळायला त्या पात्र आहेत. हे खरे नाही की, ही रक्कम वादींना देणार नाही असे आम्ही नातेवाईकांसमोर चर्चा केली. हे खरे नाही की, वादीचा या रक्कमेशी काही संबंध नाही अशीही आम्ही चर्चा केली. दि.०७/०८/२०१८ रोजी वादींनी रक्कम त्यांना दयावी म्हणून मला विनंती केली मात्र मी नकार दिला हे म्हणणे खरे नाही. सरतपास परिच्छेद क्रं.२ मध्ये मृत्यूपत्रासारखा कागद म्हणजे वर नमूद रे.दि.मु.क्रं.०६/२०१३ मधील नि.क्रं.२४९ हा कागद होय. मृत्यूपत्राबद्दलची माहिती कधी झाली हे मला माहिती नाही. माझा सरतपास परिच्छेद क्रं. १ मधील मजकूर म्हणजे आम्हां प्रतिवादीविंरुध्द वादींनी खोटी कल्पना व तर्क करुन अपक्व व अकाली दावा दाखल केला आहे हा मजकूर खरा नाही. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, लातूर यांच्याकडील लवादाविरुध्द दाखल अपीलाचा क्रंमाक मला आठवत नाही त्याबद्दलचा पुरावा पुढल्या तारीखेला दाखल करु शकतो. वादीने चुकीचे गणित मांडून दाव्यात खोटया रक्कमा लिहील्या आहेत असे मी सरतपासात लिहीलेले आहे त्यास माझे सांगणे त्या रक्कमा खोटया आहेत. त्या रक्कमा किती आहेत हे मला माहिती नाही. मी सरतपास खोटा दिला आहे व मी आज रोजी खोटा जबाब देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**सरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-

(एस.एन.सरडे)

दिनांक २१/०८/२०२५.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

अहमदपूर.